# के. के. वाघतर्फे इको फ्रेंडली कार्यशाळा

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था, के के वाघ फाऊंडेशन, श्री. बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाऊंडेशन, स्माईल व स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्स्चेंज (स्माईल) व स्पीनच सेंटर ऑफ एक्सलन्स यांचे संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठीक ८ वाजता के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय कॅम्पस येथे इको फ्रेंडली गणेशा अर्थात शाडू माती कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेस इयत्ता पहिली ते चौथी, पाचवी ते दहावी, कनिष्ठ- वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना के के वाघ फाईन आर्ट्स (ललित कला) महाविद्यालयाच्या तज्ज्ञ मुर्तीकारांमार्फत शाडू माती पासून गणेशमूर्ती तयार करण्याचे मार्गदर्शन मिळणार आहे. या कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.